REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# जीएसटीचे फलीत महसुल वाढीकडे ....

प्रा. डॉ. शिवाजी भ. यादव[1] , प्रा. ए. एम. सय्यद[2]
[1]अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवछत्रपती कला महाविद्यालय, पाचोड, ता.पैठण, जि. औरंगाबाद.
[2]अर्थशास्त्र विभागप्रमुख, कोहिनुर महाविद्यालय, खुलताबाद, ता.खुलताबाद, जि. औरंगाबाद.

## 1.0 प्रस्तावना :

जगातील कोणत्याही देशाला अर्थव्यवस्था चालविण्यासाठी महसूलाची आवश्यकता असते. यामुळे प्रत्येक देश आपल्या जनतेवर कर लावुन महसुल प्राप्त करते. कराचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन प्रकारात वर्गिकरण केले जाते. प्रत्येक देशाने अप्रत्यक्ष करांवर जास्त भर दिलेला आहे. जीएसटी हा कर जगातील बऱ्याच देशात लावला जातो. हा अप्रत्यक्ष कर भारताने लावण्याला सुरुवात केलेली आहे. या कराचा दर जीएसटी लावणाऱ्या देशांपैकी सर्वात जास्त भारताने ठेवलेला आहे. यामुळे देशात कर महसुल भरणाऱ्याच्या संख्येत 5 ते 6 टक्के वाढेल असे अर्थमंत्री अरुण जेठली यांनी म्हटले आहे. जगातील विकसित फ्रान्स, फिनलंड, इटली, डेन्मार्क देशात जीडीपीच्या तुलनेत कराचे प्रमाण 40 ते 50 टक्क्यापर्यंत आहे. पण विकसनशिल भारत, पाकिस्तान, चीन अशा देशाला करापासुन मिळणारा महसुल तुलनात्मकदृष्टया फारच कमी आहे. भारतासारख्या देशाने कराच्या महसुलात वाढ करण्यासाठी जीएसटी अप्रत्यक्ष कर प्रणाली देशात 1 जुलै 2016 पासुन लागू केलेली आहे. या अप्रतयक्ष कर प्रणालीमुळे देशाच्या महसुलात किती टक्क्यांपर्यत वाढ होईल हे येणाऱ्या काळात निश्चित होणार आहे.

देशात कोणत्याही पक्षाची सत्ता आली तरी महसुल प्राप्ती शिवाय जनहिताच्या योजना राबविणे शक्य नसते. कर महसुलात वाढ करण्याचे उद्दिष्टये सरकारचे असले तरी करातील गुंतागुतच कमी करणे, आर्थिक विषमता कमी करणे, प्रादेशीक समन्याय प्रस्थापित करणे, कर वसुलीत समन्यायनिर्माण करणे, आर्थिक स्थिरता प्रस्थापित करणे, आर्थिक विकासाला प्रेरणा देणे असे हेतु समोर ठेवण्यात आलेले असतात. एक्साईज डयुटी, सर्व्हिस टॅक्स केंद्र व व्हॅट, मनोरंजन कर, लक्झरी कर, लॉटरी कर, एंट्री कर राज्य या सर्व कराऐवजी व्यापाऱ्यांना जीएसटी हा एकच अप्रत्यक्ष कर दयावा लागेल. जीएसटी कर प्रणालीमुळे ऑनलाइन (डिजीटल) व्यवहारात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. आज देशातील कोणत्याही राज्यातुन एखादी वस्तु खरेदी केली तरी त्या वस्तुची किंमत सर्वत्र सारखीच आहे. यापुर्वी देशात एकाच वस्तुची किंमत राज्याच्या कराचे दर सारखे नसल्याने समान नव्हती. यामुळे प्रत्येक ठिकाणीच्या किंमतीनुसार लोकांना वस्तु खरेदी करावी लागत होती. या समस्येतुन आज लोकांची सुटका झालेली आहे.

## 1.1 जीएसटी म्हणजे काय ?

जीएसटी या शबदाचा अर्थ वस्तु आणि सेवा कर असा आहे. देशातील केंद्र व राज्य सरकारच्या वेगवेगळया अप्रत्यक्ष कराचे एकत्रीकरण करुन जीएसटी हा एकच कर प्रणाली तयार केलेली आहे. अप्रत्यक्ष करातील वस्तु व सेवा कर हा सर्वात मोठा लागु करण्याचा निर्णय घेण्याचे धाडस सरकारने केलेले आहे. जीएसटीमुळे दोहेरी करारोपण आणि कस्टेडिंग इफेक्ट थांबल्याने राष्ट्रीय बाजाराचा विस्तार होण्यासाठी त्याचा फायदा होईल.




## 1.2 संशोधनाची उद्दिष्टये :

1. जीएसटीच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
2. जीएसटीच्या दराचा अभ्यास करणे.

3. जीएसटीमुळे वस्तुच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.
4. जीएसटीमुळे होणाऱ्या फायदयाचा अभ्यास करणे.

## 1.3 संशोधन पध्दती :

देशात कररचनेतील क्लिष्टता कमी करण्यासाठी जीएसटी करसुधारणेचे अन्यसाधारण महत्व वाढत आहे, याची माहिती विविध संदर्भ पुस्तके, सांख्यिकीय अहवाल, आर्थिक व सामाजिक समालोचन, जीएसटी करसुधारणा विधेयक, विविध मासिके, वृत्तमानपत्रे इत्यादी द्वितीय स्त्रोतातुन घेतलेली आहे.

## 1.4 जीएसटीचा इतिहास :

देशात वस्तु व सेवा कर लागु करण्यासाठी 2000 मध्ये अटल बिहारी वाजपेयी सरकारने राज्यवित्त मंत्र्याची इम्पावर्ड कमिटी स्थापन केली होती. ही कमिटी स्थापन करण्यामागचा उद्देश वर्तमान टॅक्स बंद करुन नवीन वस्तु व सेवा (जीएसटी बील) कर बील आणणे होता. या कमिटीचे अध्यक्ष पश्चिम बंगालचे वित्तमंत्री दासगुप्ता होते. एम्पावर्ड कमिटीला वस्तु व सेवा कर देशात लागु करण्यासाठी आपला अहवाल केंद्र सरकारला सादर करावा असे सुचविण्यात आले होते. केंद्रीय अर्थसंकल्प 2006–07 ला केंद्रीय वित्तमंत्री पी.चिदंबरम् यांनी 28 फेब्रुवारी 2006 मध्ये संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात जीएसटी बिल ठेऊन 1 एप्रिल 2010 पासुन देशात लागु करता येईल व राज्य वित्तमंत्र्याची एम्पावर्ड कमिटी केंद्र सरकार सोबत जीएसटी बिलासाठी काम करेल असे म्हटले होते. 10 मे 2007 मध्ये एम्पावर्ड कमिटीने जॉईट वर्किंग ग्रुप तयार केला. हा रिपोर्ट 19 नोव्हें.2007 मध्ये एम्पावर्ड कमिटीला सादर केला. एम्पावर्ड कमिटीने 27 नोव्हें.2007 मध्ये रिपोर्टवर सविस्तर चर्चा करुन त्यात काही बदल करुन फायनल रिपोर्ट तयार केला. हा रिपोर्ट एम्पावर्ड कमिटीने 30 एप्रिल 2008 मध्ये भारत सरकारला सादर केला. 12 डिसेंबर 2008 मध्ये भारत सरकारने वस्तु व सेवा कर (जीएसटी) यावर भाष्य केले. एम्पावर्ड कमिटीने 16 डिसेंबर 2008 मध्ये वस्तु व सेवा करातील उणिवाचा स्वीकार केला. जीएसटी बिल केंद्रीय वित्तमंत्री अरुण जेटली यांनी मे 2015 मध्ये लोकसभेत सादर केले व ते पारित होऊन 3 ऑगस्ट 2016 मध्ये राज्यसभेत पारित झाले. देशातील कर संबंधीची स्वातंत्र्यानंतर पहिली सुधारणा जीएसटीच्या बिलाची आहे. या बिलामुळे देशात एकाच दराने टॅक्स 1 जुलै 2017 पासुन सुरु झालेला आहे.

## 1.5 जीएसटी कराचा दर :

जगातील बऱ्याच देशात जीएसटी हा कर लावला जातो. आशिया खंडातील जीएसटी दर 28 टक्के, सिंगापुरचा 7 टक्के, मलेशियाचा 6 टक्के, थाईलंड 7 टक्के, इंडोनेशिया 10 टक्के, चीन 17 टक्के, पाकिस्तानचा 17 टक्के आहे. तर युरोपातील जर्मनीचा 19 टक्के, डेन्मार्क 25 टक्के, फ्रान्सचा 20 टक्के आहे. भारताने जीएसटी करदराचे पाच टप्पे केले आहेत. पहिला टप्पा शुन्य टक्के, दुसरा टप्पा 5 टक्के, तिसरा टप्पा 12 टक्के, चौथा टप्पा 18 टक्के व पाचवा टप्पा 28 टक्के ठेवलेला आहे. जगातील कोणत्याही देशात जीएसटीचा 28 टक्के एवढा दर ठेवलेला नाही. भारतात जीएसटीचा दर जगात सर्वात जास्त असल्याने निश्चित महसुलात वाढ झालेली आहे.

## 1.6 जीएसटीमुळे वस्तुच्या किंमतीत होणारा बदल :

देशातील ताजे मास, मासे, कोंबडा, अंडे, दुध, ताक, दही, ताजे फळे, भाज्या, आटा, बेसनपीठ, प्रसाद, सिंदूर, वृत्तमानपत्रे, हॅण्डलुम व पुस्तके यावर शुन्य टक्के कर लावला आहे. माशाचे मास, मलाई, मलाही रजित दुध, दुध पावडर, ब्रॅण्डेड पनीर, कॉफी, चहा, मसाले, पिज्जा, ब्रेड, साबुदाना, जमिनी तेल, कोळसा यावर 5 टक्के जीएसटी, फ्रोजन मास उत्पादन, मख्खन, पनीर, घी, मेवे, पशु, चर्बी, सॉस, नमक, आयुर्वेदिक औषधी, दंत पावडर, अगरबत्ती, रंगीत पुस्तके, चित्र पुस्तके, छत्री, सिलाई मशिन, सेल फोन यावर 12 टक्के, स्वादिष्ट रिफाईड साखर, पास्ता, पेस्ट्री, केक, संरक्षित भाज्या, जैम, सॉस, सुप, आईसक्रिम, शुध्द पाणी, भोजन मिक्स, टिश्यु, लिफाफे, नोट, बुक्स, कैमेरा, स्पीकर, मॉनिटर यावर 18 टक्के तर च्यईंगम, गुळ, चॉकलेट, वेफर्स, पान मसाला, सोडा, डिओडोरेन्ट, शेविंग क्रिम, शैम्पु, वॉलपेपर, सिरेमिक, वॉटर व्हिटर, बर्तन साफ साबुन, वजन मोजणारी मशीन, ऑटोमोबाईल, मोटारसायकल, हवाई जहाज यावर 28 टक्के जीएसटी ठेवलेला आहे.

जीएसटी लागु केल्यावर गहु, ज्वारी, बाजरी, तांदुळ, दाळ, दुध यावर टॅक्स लावलेला नाही तर कॉफी, चाय, साखर, खाद्यतेल, रुई, कैब, सवारी ओला, एसी रेल्वे यावर 5 टक्के टॅक्स लावलेला आहे. बिस्कीट, आईसक्रिम, चॉकलेट, केसतेल, साबन, टुथपेस्ट, शाम्पु, चेहरा क्रिम, सिल्क आणि ज्युट, फुटवेअर 500 रुपयापेक्षा कमी, रीवी एसी, फ्रीज, वाशिंग मशीन, फर्निचर, स्मार्ट फोन, फिल्म तिकिट, हवाई यात्रा अर्थव्यवस्थावर्ग स्वास्थ देखरेख, हॉटेल बुकिंग 1000 रुपयापर्यंत, हॉटेल बुकिंग 1000 ते 2500 रुपयापर्यंत, रेस्तौरेंटस 50 लाख रुपया पर्यंत, एसी बरोबर लाईसन लक्झरी कार, एसयुबी या वस्तु स्वस्त होणार आहेत.

मैनमेड, फाईबर, आयुर्वेद, फुटवेअर 500 रुपयापेक्षा कमी किंमत असणारे, सोने, विमा प्रीमिअम, बॅकिंग शुल्क, टेलीफोन, मोबाईल, रखरखाव शुल्क 5000 रुपयापर्यंत, एसी रेल्वे, हवाई मात्रा व्यापारी वर्ग, हॉटेल बुकिंग 2500 ते 5000 रुपयापर्यंत, लक्झरी हॉटेल 5 स्टार, छाटी पेट्रोल कार या वस्तुवरिल कराचा दर वाढविल्याने या वस्तु महाग झाल्या आहेत.

जीएसटी अप्रत्यक्ष कर लागु करण्यापुर्वी देशातील राज्य एकाच वस्तुवर वेगवेगळे कर लावत असल्याने प्रत्येक राज्यात एकाच वस्तुच्या किंमती सारख्या नव्हत्या. जीएसटी कर प्रणालीमुळे एकाच वस्तुची किंमत सर्वत्र सारखीच झाली आहे.

### 1.7 जीएसटीचे फायदे :

देशात वस्तु व सेवा कर 1 जुलै 2017 पासुन लागु केलेला आहे. यामुळे देशात कोणत्याही वस्तुची किंमत सारखीच झालेली आहे. जीएसटीमुळे व्यापारी व जनता यांचे अनेक फायदे होणार आहेत.

1. जीएसटी प्रणाली लागु करण्यापुर्वी कर महसुलात फार मोठी वाढ केव्हाच झालेली नव्हती. पण जीएसटी अप्रत्यक्ष कर प्रणाली लागु केल्यापासून महसुलात 11 टक्क्यांनी वाढ होऊ लागली आहे.
2. देशाच्या कर उत्पन्नात वाढ होत असल्याने डोमेस्टीक प्रोडक्टमध्ये वाढ होऊन प्रगतीचा वेग वाढणार आहे.
3. वस्तु व सेवा एकाच वेळी पुरविल्या जातात त्यावर जीएसटी एकाच दराने लागते.
4. जीएसटीमुळे करदात्यांच्या संख्येत 5 ते 6 टक्के वाढ झाल्याने प्रगतीचा दर 1.5 टक्क्याने वाढण्याची शक्यता आहे.
5. विविध प्रकारच्या वस्तुचे वर्गिकरण सोपे आणि साधे केल्याने यामुळे कर लावण्यासाठी कोणत्याही वस्तुची वर्गिकरण वादग्रस्त होत नाही.
6. टॅक्सच्या रचनेत जीएसटीने पारदर्शकता आणल्याने पुर्वी 30 ते 35 टक्के दराने कर भरावा लागत होता तो आज 20 ते 25 टक्के दराने भरावा लागत आहे.
7. देशातील राज्यामध्ये ज्या कंपन्या वस्तुचे उत्पादन करत होत्या, त्या वस्तु त्याच राज्यात विकल्या जात होत्या कारण राज्याबाहेर विकल्यास सेन्ट्रल सेल्स टॅक्स आणि एन्ट्री टॅक्स लागत होता आता तो लागणार नाही.
8. कर आकारणी, कर चुकवगिरी, कर वसुली ही हेराफेरी जीएसटीमुळे बंद होणार आहे. याच बरोबर वेगवेगळे कर भरण्यापासुन सुटका झाली आहे. कंपन्यांना एकाच वस्तुसाठी वेगवेगळे कर भरावे लागत होते. जीएसटीमुळे कर महसुलाची रककम वाढुन वस्तुंच्या किंमती कमी राहणार आहेत.
9. देशात समान वस्तुंच्या खरेदीसाठी एकच कर आणि एकाच दराने द्यावा.
10. जीएसटी कर भरणे सोपे होऊन कर भरण्याच्या पध्दतीत सहजता आणि सुलभता आली आहे.
11. वस्तु व सेवा कर लागु झाल्यानंतर कृषी क्षेत्राला काहीसा दिलासा मिळाल्यानंतर आर्थिक विकासाच्या दरात वाढ होणार आहे.

### मुल्यमापन :

देशात जीएसटी लागु करण्यासाठी जवळपास 17 वर्ष वाट पाहावी लागली. जगात जीएसटीचा सर्वात जास्त दर भारताचा असला तरी पुर्वी लावल्या जाणाऱ्या अनेक करातुन व्यापारी, उत्पादक व उपभोक्ते यांची यातुन सुटका झालेली आहे.

जगात भारताचा लोकसंख्येबाबतीत दुसरा क्रमांक लागतो. आपल्या देशात प्रत्यक्ष कर भरणाराची संख्या 3 कोटी पेक्षा जास्त वाढण्यास तयार नाही. जीएसटी कर प्रणाली लागु झाल्यानंतर अप्रत्यक्ष करांच्या महसुलाच्या वाढी बरोबर प्रत्यक्ष कर महसुलात काही अंशी वाढीला मदत होत आहे.

भारताने 0, 5, 12, 18 व 28 टक्के अशा पाच टप्यात जीएसटीचा दर निश्चित केलेला आहे. देशात उत्पादीत होणाऱ्या वस्तु व सेवांवर किती टक्के दराने टॅक्स लागणार हे निश्चित केल्याने कराबाबतची असणारी संभ्रमता संपुष्टात आली आहे.

**संदर्भ :**


1. जीएसटी 122 वे घटनादुरुस्ती विधेयक
2. www.gstindia.com
3. www.hpshopping.in/gst/solation
4. www.india.com
5. www.gst.connect.in
6. www.mahavat.gov.in
7- एम्पावर्ड कमिटी रिपोर्ट
8. www.indianbudget.com
9. www.gstefile.com
10. https://www.gst.govt.in